I/O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. सिडको **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/03/2021 01:38 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 15/03/2021
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/03/2021
**Time From (वेळेपासून):** 15:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/03/2021 **Time (वेळ):** 01:26 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/03/2021 01:26 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** विभागीय कार्यकारी अभियंता ,कार्यालय, ग्रामीण विभाग क्रं 1, चिखलठाणा औरंगाबाद

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दत्तात्रय गोविंदराव पुंड

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | औरंगपुरा औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | औरंगपुरा औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8275513360

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आशिष बाबुलाल जैस्वाल | | | 1. 8-12-448, खासगेटजवळ,जिन्सी, औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली . | 6,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 6,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

श्री. दत्तात्रय गोविंदराव पुंड, वय 49 वर्षे, व्यवसाय गुत्तेदारी रा.औरंगपुरा औरंगाबाद मो.नं. - 8275513360 आरोपी- श्री. आशिष बाबुलाल जैस्वाल, वय 31 वर्ष व्यवसाय गुत्तेदारी रा. खासगेटजवळ घर नं 8-12-448 जिन्सी, औरंगाबाद (खाजगी इसम) गु.घ.ता.वेळ व ठिकाण-दिनांक 15.03.2021 रोजी 15.00 वाजेच्या सुमारास विभागीय कार्यकारी अभियंता कार्यालय, ग्रामीण विभाग क्रं 1 , चिखलठाणा औरंगाबाद येथे खुलासा- नमुद ता वेळी व ठिकाणी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार हे महावितरण कंपनीमध्ये गुत्तेदार म्हणुन काम करीत असुन त्यांचेकडील दोन ग्राहकांचे ग्राहकांचे इन्स्टीमेंट विभागीय कार्यकारी अभियंता, महावितरण ग्रामीण नं 1 चिखलठाणा, औरंगाबाद यांचेकडुन मंजुर करुन देतो, असे म्हणुन आरोपीने तक्रारदार यांचेकडे 7,000/- रूपये लाचेची मागणी करून 6,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारली, म्हणुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करुन सदर गुन्हंयाचा तपास श्री. एस. एस. शेख, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, जालना मो. नं. 9823216788 यांचेकडे दिला. मी दत्तात्रय गोविंदराव पुंड वय 49 वर्ष व्यवसाय गुत्तेदारी रा.प्लट नंबर 16(A),पश्चिम एस.बी. कलनी,औरंगपुरा,औरंगाबाद जि.औरंगाबाद मोबाईल नंबर 8275513360.समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना कार्यालयात हजर राहुन तोंडी फिर्याद देतो की,मी वरील प्रमाणे राहणारा असुन महावितरण कंपनीचे रिडींगचे व ग्राहकांचे कनेक्शन चे कामे गुत्तेदारी पध्दतीने करुन कुटंुबाचा उदर निर्वाह भागवितो.मी ग्राहकांचे विद्युत कनेक्शन साठी लागणारे पोल,डि.पी.,वायर इत्यादीचे गुत्तेदारी पध्दतीने कामे करुन देतो.माझ्या कडे गुत्तेदारीचे अधिकृत परवाना आहे.मी दिनांक 04/03/2021 रोजी सकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे फोन व्दारे एका इसमा विरुध्द लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रार असल्याचे कळविले वरुन पोलीस निरीक्षक श्री.एस.एस.शेख हे त्यांचे टिम सह प्रोझोन मल सिडको समोर औरंगाबाद येथे आले होते.तेंव्हा त्यांना मी तक्रार दिली होती की, ग्राहक श्री.उत्तम नरसिंग उर्किडे व श्री.शिवाजी संपत ठोंबरे यांचे कामाचा प्रस्ताव इंन्स्टीमेंन्ट मंजुरी साठी कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.ग्रामीण विभाग क्र.1 यांच्याकडे आज दिनांक 04/03/2021 रोजी प्रस्ताव दाखल केला आहे.सदर कामाचे ग्राहक श्री.उत्तम नरसिंग उर्किडे यांचे फाईलचे इंन्स्टीमेंन्ट मंजुरीसाठी खाजगी इसम श्री.आशिष जैस्वाल हा कार्यकारी अभियंता ग्रामीण विभाग क्र 1 श्री.जितेंद्र वाघमारे यांचे कडुन मंजुर करुन देतो असे म्हणुन 7000/-रुपये लाचेची मागणी करत आहे. मला श्री.आशिष जैस्वाल यांना लाच द्यायची इच्छा नाही त्यांची माझी वैयतीक दुश्मणी नाही.माझा त्यांचा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही.लाच देण्यासाठी लाचेची रक्कम मी सोबत आणलेली आहे.तो मला मागणी करत असलेली रक्कम लाचेची आहे ते मला माहित आहे. आज दिनांक 04/03/2021 रोजी कार्यकारी अभियंता कार्यालय ग्रामीण विभाग क्र.1 चिकलठाणा गरवारे स्टेडियम समोर औरंगाबाद येथे जाऊन खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांची भेट घेवुन माझे ग्राहकाचे काम करुन देण्यासाठी विनंती करणार आहे.

तो मला लाचेची मागणी करतो की किंवा कसे याबाबत खात्री करुन त्याने लाचेची मागणी केल्यास पुढील योग्य ती कार्यवाही करावी हि विनंती अशी तक्रार दिली होती. त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी माझी तक्रार पंचाना वाचण्यास देवुन पंचाची ओळख करुन देवुन त्यावर त्यांनी व पंचानी सहया केल्या.त्यानंतर लागलीच सदर तक्रार खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांचे विरुध्द केलेली खरी आहे काय व खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल हे माझ्याकडे लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी,लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी सदर ठिकाणाहुन माझ्या सोबत पंच श्री.प्रशांत जोशी यांना देण्यात आले.माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते.त्यानंतर मी विभागीय कार्यकारी अभियंता कार्यालय ग्रामीण विभाग क्र.1 चिकलठाणा औरंगाबाद येथे जावुन खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांची भेट घेतली असता त्यांनी ग्राहक नामे श्री.उत्तम नरसिंग उर्किडे यांचे कामाचा प्रस्तावाचे विभागीय कार्यकारी अभियंता कार्यालय ग्रामीण विभाग क्र.1 चिकलठाणा औरंगाबाद येथुन इंन्स्टीमेंन्ट मंजुरी करुन देण्यासाठी 7000/-रुपये लाचेची मागणी करुन स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच वेळी लाच मागणी पडताळणी पंचनामा सापळा पथकाने त्यांचे जवळील लपटपवर केला. दिनांक 04/03/2021 रोजी केलेल्या पडताळणी वरुन आज दिनांक 15.03.2021 रोजी ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.शेख यांनी व त्यांचे पथकाने खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविण्यात आले.औरंगाबाद येथे गरवारे स्टेडियमच्या मेन गेट समोर रोडलगत सुरक्षीत ठिकाणी खाजगी वाहनामध्ये अंथ्रासीन पावडरची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेल्या पैशातुन पाचशे रुपये दराच्या चौदा नोटा वेगळे काढुन त्यांचे क्रमांक लिहुन घेवुन 7,000/- रु रक्कमेवर अंथ्रासीन पावडर लावले.खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांना देण्यासाठी थ्रसीन पावडर लावलेले पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवले.सर्वांना त्यांचे कामे समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी मला सुचना दिल्या की,खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांनी लाच स्वीकारल्यानंतर तुम्ही इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील गच्चीवर नियोजित कन्टीन जवळ येवुन तोंडाचा रुमाल काढुन तोंड पुसुन ईशारा करण्याचे सुचना दिल्या.त्यावरुन मला व पंच श्री. प्रशांत जोशी यांना विभागीय कार्यकारी अभियंता कार्यालय ग्रामीण विभाग क्र.1 चिकलठाणा औरंगाबाद येथे इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर थांबण्यास सांगुन त्याठिकाणी इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब व सर्व स्टफ तसेच पंच नं.2 श्री.सतिश फोलाने असे येवुन सर्व जण एकमेकांना दिसतील अशा प्रकारे थांबले खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांचे विरुध्द सापळा लावण्यात आला.मी व पंच श्री.प्रशांत जोशी असे दोघे इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर झेरक्स मशीन जवळील खुर्चीवर बसलो तेंव्हा अंदाजे दुपारी तीन वाजेच्या सुमारास श्री.आशिष जैस्वाल हा आला व त्याने मला जिन्या जवळील मोकळया जागेत बोलावुन घेतले व मला तुमचे काम झाले कोटेशन भरुन घ्या असे म्हणाला.मी श्री.आशिष जैस्वाल यास ठरलेले माझे जवळील सात हजार रुपये दिले असता त्याने मोजुन घेतले व त्याने त्यापैकी पाचशे रुपये दराच्या दोन नोटा एक हजार रुपये परत माझ्याकडे दिले व त्याने सदर फाईल साठी सहा रुपयेच लागले असल्याचे सांगुन श्री.आशिष जैस्वाल यांने बाकीचे 6000/-रुपये त्याचे पँटचे पाठी मागील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवले.त्यावेळी पंच श्री.प्रशांत जोशी हे समक्ष हजर होते.त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे नियोजीत कन्टीन जवळ गच्चीवर जावुन इशारा केला तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री.सतिश फोलाने असे लगेच त्याठिकाणी येवुन खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांना ताबडतोब पकडले. मला पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी जवळ बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर कर्मचारी श्री.चेके यांनी बंद केला तसेच पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांना त्यांची स्वत:ची व सर्वांची ओळख करुन दिली.पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.आशिष बाबुलाल जैस्वाल वय 31 वर्षे व्यवसाय मजुरी रा.घर नंबर 8/12/448,खासगेट जवळ जिन्सी औरंगाबाद असे सांगितले.तेव्हा त्याची तेथेच पंचासमक्ष अंगझडती घेवुन त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम पाचशे रुपये दराच्या बारा नोटा एकुण सहा हजार रुपये पंचासमक्ष जप्त केले तसेच त्यांचे दोन्ही हाताचे तळव्यावर व बोटाचे पे-यावर ल्ट्राव्हायलेट लँपच्या प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे हातावर व पै◌शावर हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली व माझे हात तपासण्यात आले तेंव्हा माझ्या जवळील पाचशे रुपये दराच्या दोन नोटा एक हजार रुपये पोलीस निरीक्षक श्री. शेख यांनी जप्त केले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब,स्टाफ,दोन्ही पंच,मी व खाजगी इसम नामे श्री.आशिष जैस्वाल यांना सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो.सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा लपटवर करण्यात आला.दिनांक 04/03/2021 रोजी खाजगी इसम श्री.आशिष बाबुलाल जैस्वाल वय 31 वर्षे व्यवसाय मजुरी रा.घर नंबर 8/12/448,खासगेट जवळ जिन्सी औरंगाबाद याने पंचा समक्ष ग्राहक नामे श्री.उत्तम नरसिंग उर्किडे यांचे कामाचा प्रस्तावाचे विभागीय कार्यकारी अभियंता कार्यालय ग्रामीण विभाग क्र.1 चिकलठाणा औरंगाबाद येथुन इंन्स्टीमेंन्टची फाईल श्री.जितेंद्र वाघमारे कार्यकारी अभियंता ग्रामीण क्रमांक 1 यांचे कडुन मंजुर करुन देतो असे म्हणुन सात हजार रुपयांची मागणी करुन आज दिनांक 15/03/2021 रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास पंचा समक्ष सहा हजार रुपयेची लाच स्विकारली तेव्हा रंगेहात पकडण्यात आले आहे.त्याचे विरुध्द कायदेशिर कारवाई करावी ही विनंती. मी दिलेली फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

P.I. S.S. Shaikh. जालना ला.लु. यांचे कडे वर्ग केला

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): sanjay bhagwan mante

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): 12345 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

पोलीस ठाणे-एम.आय.डी.सी.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Vitthal Subhashrao Pote
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI